# गर्भसंस्कार केंद्र गृहअर्थशास्त्राच्या विद्यार्थीनींसाठी स्वयंरोजगाराच्या नवीन संधी !!!

**डॉ.रंजना जिवने**
*गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख*
*श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद*

***सारांश :-***
*स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्त्रियांना समाजातील विविध क्षेत्रात समान संधी प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने शिक्षण आयोगाने स्त्री शिक्षणामध्ये बराच बदल केला आहे. स्त्रियांचा व्यक्तिमत्वम विकास व्हावा व त्या आत्मविश्वासी होऊन आत्मनिर्भर व्हाव्यात यासाठी गृहविज्ञान तंत्रविज्ञानाचा अधिकाधिक अंतर्भाव केला गेला, ह्या शिक्षणातून स्त्रियांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या जास्त संधी उपलब्ध व्हाव्यात ह्याकरीता सतत प्रयत्न सुरू आहेत.*
*गृहअर्थशास्त्राच्या माध्यमातून स्वयंरोजगाराचे शिक्षण स्त्रियांना मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये जागृती व चेतना निर्माण होऊ शकते.कारण रोजगारामुळे केवळ आर्थिक प्राप्तीच होते असे नाही तर त्या बरोबर आर्थिक स्वातंत्र्य व त्याचा उपयोग करण्याची संधी प्राप्त होते, मानसिक समाधान मिळते, गृहअर्थशास्त्राच्या शिक्षणामुळे विद्यार्थिनींना अनेक क्षेत्रात स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतात आणि मुली स्वयंरोजगार करण्यासाठी पुढे येत आहेत. गृहशास्त्र व गृहअर्थशास्त्रचे शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थीनी विविध व्यवसाय करुन आपले जीवन उत्कृष्ट व यशस्वीपणे जगत असलेल्या आपण पाहतो आणि म्हणूनच बदलत्या काळाला अनुसरून असे कोणते उद्योग आहेत ज्यामुळे ह्या विद्यार्थिनींना स्वतःचा विकास साधत असतांना समाजाचा विकासही साधता येईल ह्याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तृत संशोधन लेखनात केला आहे.*

**प्रस्तावना :-**

पुरुष आणि स्त्रियां हे दोघेही समाज व्यवस्थेचे घटक, दोघांचीही निश्चित भूमिका आहे आणि ती परस्परांना पूरक आहे ह्या दोन्ही वर्गाच्या भूमिकांच्या परस्पर पुरकतेवर प्रत्येक कुटुंबाचे अस्तित्व व प्रगती आणि प्रत्येक समाजाचे स्वास्थ व उन्नती अवलंबून असते उत्तम प्रजेची निर्मिती हे अत्यंत महत्त्वाचे कार्य कुटुंब करीत असते आणि हीच गोष्ट संस्कार म्हणून बघितली तर सशक्त व निरोगी बाळ जन्माला येण्यासाठी गर्भसंस्काराला अतिशय महत्त्व आहे. ह्या गोष्टी समाजांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत त्याचा सरळ प्रभाव मानवी विकासावर होतो,म्हणून उत्तम प्रजेच्या निर्मितीसाठी गर्भसंस्कार केंद्र आणि मानवीय सहसंबंध सुमधुर होण्यासाठी विवाह पुर्व मार्गदर्शन काळाची गरज आहे आणि ह्या विषयाचा अभ्यास गृहअर्थशास्त्र विषयात पदव्युतर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थीनींचा होत असल्यामुळे त्यांना ह्या क्षेत्रात स्वयंरोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात ह्याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तृत संशोधन लेखनात केला आहे**.**

❖ **समाजांच्या निर्मितीसाठी गर्भसंस्कार केंद्राची आवश्यकता :-**

मुल सुदृढ, निरोगी, संस्कारसंपन्न आणि बुद्धीमान होण्यासाठी मातापिता शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या स्वस्थ आणि निरोगी असले पाहिजेत, आजही अनेकांना गर्भसंस्काराचे महत्त्व काहीच वाटत नाही कारण त्यांना असे वाटते की,सर्व इंद्रियांनी सक्षम अशा धडधाकट मुलांवर कितीही संस्कार केले तरी तो सुधारण्याचे नाव घेत नाही.तिथे जन्माला येण्याअगोदरच्या मासाच्या गोळ्याला संस्काराचे काय देणे घेणे. परंतु गर्भावर मातेच्या जीवनशैलीचा, आहारविहाराचा, संगिताचा, मानवी भावनांचा परिणाम होतो हे संशोधनाने सिद्ध झाले आहे.

संशोधनाने हेही सिद्ध झाले आहे की गर्भ हा १६ आठवड्यांचा असल्यापासून ऐकू शकतो पण प्रत्यक्षात त्याचा कान हा २४ आठवड्यादरम्यान तयार होतो त्या गर्भाला १८-२०

आठवड्यादरम्यान दृष्टी येते. २८ आठवड्यापर्यंत त्याच्या पापण्या मिटलेल्या असतात. याचा आर्युवेदाने खुप सुक्ष्म स्तरावर अभ्यास केला आहे.आर्युवेद असे सांगते की, संतती प्राप्तीची इच्छा असणाऱ्या दांपत्यानी बीजसंस्कार करुन घ्यावे,कारण ``शुध्द बीजापोटी | फळे रसाळ गोमटी |असे संतशिरोमणी तुकाराम महाराजांनी सांगितलेलेच आहे.

❖ **गर्भसंस्कार म्हणजे काय ?**

प्रत्येक मनुष्यावर १६ प्रकारचे संस्कार करण्यात यावेत अशी भारतीय संस्कृतीमध्ये मान्यता आहे.एखाद्या विशिष्ट पदार्थातील उत्कृष्ट गुणांची प्रयत्नपुर्वक प्राप्ती करून घेणे, ह्यालाच संस्कार' असे म्हणतात.ज्या प्रमाणे अशुध्द सोन्यावर अनेक संस्कार केल्यावर त्यानंतरच त्या पासून दागिने बनविले जातात, त्याचप्रमाणे भावीमाता-पिता या दोघांना मानसिक, शारीरिक, भावनिक दृष्ट्या तसेच समतोल आहाराचे ग्रहण करून शरीर सुदृढ बनवून नंतर गर्भधान विधी केला जातो आणि गर्भधारणा झाल्यानंतर नऊ महिन्यांपर्यंत त्या माता व पित्यांना मार्गदर्शन नियमितपणे केले जाते.

“आहार निद्रा भय मैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् |'' ह्याचा अर्थ असा की, झोप, आहार, भिती आणि मैथुन या चार गोष्टी मनुष्य आणि प्राण्यांमध्ये सारख्याच असतात. परंतु सर्वात मोठा फरक हा आहे की प्राणी केवळ प्रजोत्पादनासाठी मैथुन करणे हा असून मनुष्य मात्र त्यापलीकडे जाऊन काया वाचा मनाने उत्तम गुणाची आणि निरोगी अशी संतती प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न केवळ मनुष्याकडूनच केले जाते.

❖ **आज गर्भसंस्काराची आवश्यकता आहे का ?**

एका अभ्यासात असे निदर्शनास आले की सर्वात जास्त प्रजनन क्षमता असणारा पक्षी म्हणून चिमणी प्रसिद्ध आहे. मात्र त्यांच्या संख्येत अतिशय वेगाने धक्कादायक अशी घट झाली ती मोबाइलचे टॉवर, मायक्रोवेव्ह यासारख्या उपक्रमातून निघणाऱ्या विद्युत चुंबकीय लहरींमुळे तर मग सतत आपल्या जवळ मोबाईल बाळगणाऱ्यांची काय अवस्था होईल.

सध्या मुलींना लवकर मासीकपाळी सुरु झाली, त्यातच शिक्षणामुळे लग्नाचे वय वाढलेले आहे.आर्थिक आणि सामजिक स्तर सुधारण्याची जणू स्पर्धा लागली आहे, त्यातून मानसिक ताणतणाव वाढत आहे, कृत्रिम रंग, प्रिझरव्हेटिव्हज, रासायनिक घटकांचा फळ व भाज्यांमधून शरीरातून प्रवेश, मोबाईल, लॅपटॉपमूळे सतत इंटरनेटचा वापर ह्यामुळे विद्युतचुंबकीय लहरींचा दुष्परिणाम प्रकर्षण ह्यामुळे पुर्वी सारखी गर्भावस्था नैसर्गिक राहिलेली नाही.त्यातून नोकऱ्यांचे वाढलेले तास,खाण्याच्या आणि झोपण्याच्या अनियमित वेळा ह्यामुळे पतीपत्नीमधील सुसंवाद कमी झालेला आहे.आणि म्हणूनच गर्भधारणेत अडचणी त्यामुळे गर्भसंस्कार' वर्गाची आवश्यकता समाजात वाढली आहे.

❖ **अभ्यासाचे उद्दीष्ट्ये :-**

- बदलत्या जीवनशैलीमध्ये आदर्श संतती (चांगली संतती) निर्माणासाठी गर्भसंस्काराचा काय सहभाग आहे त्याचा शोध घेणे.
- गृह अर्थशास्त्रामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थीनी खरं गर्भसंस्कार वर्ग चालवून स्वयंरोजगार उभा करुन शकतात का ह्याचा शोध घेणे.
- गर्भसंस्कार करून घेण्यासाठी आज समाजाची काय मानसिकता आहे ह्याचा शोध घेणे.

❖ **गृहितके :-**

1. गृहअर्थशास्त्र विषयाच्या अध्ययनातून पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनी गर्भसंस्कार केंद्र चालवू शकतात.
2. गर्भसंस्कार आवश्यक आहे हे समाजाने स्वीकारले आहे.

❖ **अध्ययन क्षेत्र :-**

या अध्ययनासाठी पुसद शहरातील ३० कुटुंबाची निवड नमुना म्हणून करण्यात आली.

❖ **तथ्य संकलनाची पध्दती व साधने :-**

तथ्य संकलनासाठी पुसद शहरातील ३० कुटुंबाची निवड करून प्रश्नावली द्वारे त्यांची मते जाणून घेण्यात आली,पुसद हे तहसीलचे ठिकाण असूनही नवीन गोष्टी येथील लोक लवकर

आत्मसात करतात ही गोष्ट लक्षात घेवून ह्या ठिकाणी ३० कुटुंबापैकी १५ कुटुंब नवीन लग्न झालेली होती १५ कुटुंबातील मुले लग्न होऊन एकत्र कुटुंबात राहणारे होते.

- **सारणी क्रमांक - १**

| एकत्र कुटुंबातील नवविवाहित | विभक्त असलेले नवविवाहित | एकुण |
|---|---|---|
| १५ | १५ | ३० |

❖ **अभ्यासाची मर्यादा :-**

वरील अध्ययन हे पुसद शहरापर्यंतच मर्यादित आहे.

❖ **तथ्यांचे विश्लेषण :-**

प्रस्तुत अभ्यासामध्ये १० विवाहित दांपत्य हे आय. टी. मध्ये काम करणारे होते जे लॉकडाऊनमुळे सध्या वर्क फ्रॉम होम करणारी होती.त्यांनी सांगितले की आमच्या लग्नानंतर आम्ही आज घरून काम केल्यामुळे रिलॅक्स आहोत व आता आम्ही आई बाबा होण्याचा विचार करीत आहोत परंतु आम्हाला आमचे बाळ तल्लख बुद्धीचे,सुदृढ आरोग्य असलेले पाहिजे आहे म्हणून आम्ही गर्भसंस्कार करून घेणार आहोत.

- ➢ वरील दांपत्य हे आई वडिलांकडे राहायला आलेले होते.
- ➢ पंधरा पैकी पाच जोडपी जी आई वडिलांसोबत राहत होती त्यापैकी चार आईवडिलांनी गर्भसंस्कार करायला पाहिजे असे मत व्यक्त केले तर केवळ एका कुटुंबाने ह्याची गरज नाही असे मत नोंदवले
- ➢ विभक्त राहत असलेल्या बारा जोडप्यांनी गर्भसंस्कार आम्ही करूनच घेऊ असे मत नोंदवले तर तीन जोडप्यांनी ह्याची आवश्यकता नाही असे मत नोंदवले.

**सारणी क्रमांक -२**

| नमूना | विवीध क्षेत्रातील दाम्पत्य | गर्भसंस्कार आवश्यक | गर्भसंस्कार अनावश्यक |
|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील १५ | १० दाम्पत्य आय.टी क्षेत्रातील | १० | |
| | ४ आई वडिलांसोबत राहणारी दाम्पत्य | ०४ | |
| | १ संयुक्त कुटुंबातील दाम्पत्य | | ०१ |
| विभक्त कुटुंबातील १५ | १२ व्यावसायिक व संपन्न दाम्पत्य | १२ | |
| | ३ रोज मजुरी करणारे | | ०३ |

- ➢ वरील सारणी वरुन असे लक्षात येते की उच्च शिक्षित आय.टी. क्षेत्रातील जे दाम्पत्य वर्क फ्रॉम होममुळे घरी बसून काम करीत आहेत व एकत्र कुटुंबात सध्या राहात आहेत अश्या ३३% पती-पत्नींनी गर्भसंस्काराची आवश्यकता आहे असे सांगितले आहे. ह्या वरुन असे लक्षात येते की नवीन पिढीला व सुशिक्षित दाम्पत्याला गर्भसंस्काराची आवश्यकता वाटते.
- ➢ एकत्र कुटुंबातील मात्र सर्वसामान्य घरातील २६% लोकांनी गर्भसंस्काराची आवश्यकता आहे हे स्पष्ट केले.
- ➢ तर सर्वसामान्य कुटुंबातील १ दाम्पत्याने गर्भसंस्काराची आवश्यकता नाही हे प्रतिपादिले.
- ➢ विभक्त कुटुंबातील १५ पैकी १२ कुटुंबातील नवदाम्पत्यांनी जे व्यावसायिक आहेत त्यांनी गर्भसंस्काराची आवश्यकता आहे असे मत व्यक्त केले म्हणजे विभक्त कुटुंबातील ८०% लोकांनी सकारात्मक मत नोंदविले.

- विभक्त कुटुंबातीलच मात्र रोज मजुरी करणारे ३ नवविवाहित दाम्पत्यांनी ह्याची काही गरज नाही असे मत नोंदविले म्हणजे २०% रोजमजुरी करणाऱ्या कुटुंबांनी नकार दर्शविला.

❖ **निष्कर्ष :-**

वरील सारणी वरुन असे लक्षात येते की आपले दुसरे गृहितक जे आहे, समाजातील सुशिक्षित लोक गर्भसंस्कार आवश्यकत आहे असे मानतात.ह्यावरुन आपले दुसरे गृहितक सिध्द झाले आहे. म्हणजेच उच्च शिक्षित कुटुंबाला सुप्रजनन शास्त्राचे महत्त्व पटलेले आहे.

गृहअर्थशास्त्र विषयामध्ये मानवीय विकास, विवाह व कौटुंबिक सहसंबंध ह्या सारख्या विषयाचा विस्तृत अभ्यास होत असल्यामुळे आणखी विस्तृत अभ्यास केला व एखाद्या गर्भसंस्कार केंद्रात काही दिवस जॉब स्विकारुन अनुभव ग्रहण करुन स्वतःचे गर्भसंस्कार केंद्र गृहअर्थशास्त्राच्या विद्यार्थिनी नक्कीच सुरू करू शकतात. व राष्ट्रविकासात आपले योगदान देऊ शकतात.

**संदर्भ ग्रंथ सुचि :-**

1) *https://www.esakal.com - वैद्य चौखंडे डॉ. सुषमा*
2) *https:www.marathisuushti.com - वैद्य शेवडे डॉ. परिक्षित*
3) *फॅमिली डॉक्टर - तांबे डॉ.बालाजी page no.75 - देशमुख डॉ.स्नेहलता*